# Possitive Stories

गडचिरोली दि. ०८/०६/२०१७

## मानसेवी होमगार्ड सदस्य नोंदणी

गडचिरोली जिल्हयातील गडचिरोली/आरमोरी/ देसाईगंज/ चामोर्शी/ अहेरी/ सिरोंचा या तालुक्यातील पथक/उपपथकामधील पुरुष/महिला होमगार्डची सदस्य नोंदणी दिनांक १९/०६/२०१७ रोजी पोलीस ग्राऊंड गडचिरोली या ठिकाणी सकाळी ०७.०० वाजेपासून ते ११.०० वाजेपर्यंत येणाऱ्या उमेदवारांना घेण्यात येणार आहे. होमगार्ड नोंदणी पात्रतेचे निकष पुढील प्रमाणे असतील. शिक्षण कमीत- कमी १० वी उत्तीर्ण, वय- २० ते ५० पर्यंत, उंची- पुरूषांकरीता १६२ सेमी (फक्त पुरूषाकरीता छाती न फुगविता ७६, फुगवून ८१ सेमी) व महिलांकरीता उंची १५० सेमी संबंधित उमेदवारांस विहीत केलेल्या वेळेत धावणे व गोळा फेक शारिरीक चाचणी द्यावी लागेल.

निवड होवून पात्र ठरलेले उमेदवार हे वेतनी सेवेत असतील तरी त्यांना वेतनी सेवेत असल्यास कार्यालयाचे अथवा मालकाचे नाहरकत प्रमाणपत्र, पोलीस चारीत्र्य पडताळणी अहवाल व सक्षम वैद्यकिय अधिकाऱ्यांचे शारिरीक दृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र, माजी सैनिक अथवा एनसीसी प्रमाणपत्रधारक व इतर अन्य (जड वाहन चालक परवाना, आयटीआय व खेडाळू प्रमाणपत्रधारक) तपशिलाच्या पुष्टयर्थ सर्व संबंधित प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक राहील. उमेदवारास नोंदणीच्या वेळी त्यांना स्व खर्चाने यावे लागेल तसेच नोंदणीवेळी कोणतीही अपघाती घटना घडल्यास त्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. उमेदवारांची निवड पुर्णपणे गुणवत्तेवर करण्यात येईल.